

# फेब्रुवारी महिना कसा जाईल ?

# धनुर्धारी


फेब्रुवारी २०१२ ★ रुपये २०/–

नागपूर सोहळा २०११




समाज भूषण पुरस्कार प्रदान सोहळा






श्री अण्णा गणपती - नवगग्रह सिध्दपीठम्

**येईन मी फिरून इथे -**
ज्योतिष विद्यावाचस्पती श्री. श्री. भट
यांची पुनर्जन्मावरील लेखमाला

**नांदा सौख्य भरे -**
होरामार्तंड विलास देव यांची लेखमाला

**संगीतकार - ए. आर. रहेमान**

# भुमीपुत्र : पद्मश्री श्री भवरलाल जैन

प्रचंड कष्ट करण्याची तयारी, सोबतीला बुध्दीमत्तेची जोड आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर व्यक्ती काय करू शकते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे 'बडेभाऊ' तथा श्री भवरलाल जैन असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. दिनांक १२ डिसेंबर २०११ रोजी पद्मश्री भवरलाल जैन यांच्या वयाला ७४ वर्षे पुर्ण झाली. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवन पटलावर टाकलेला हा प्रकाश... तो स्वातंत्र्यपूर्व काळ होता. देशात सर्वत्र अंधःकारच होता. इंग्रज देश लुटत होते. गरीबी मी म्हणत होती. शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांनां काबडकष्टांना तर सिमाच उरली नव्हती. स्वातंत्र्य सैनिक इंग्रजांशी झगडत होते. स्वातंत्र्य दृष्टीक्षेपात होते. पण मिळत नव्हते. गरीब शेतकरी देवाचा धावा करीत होते. उध्दाराचे वरदान मागत होते त्यांची हाक देवाने शेवटी ऐकली. दिनांक १२ डिसेंबर सन १९३७ जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात वाकोड नावाच्या एका खेडयात एक तारा जन्माला आला.



राष्ट्रपती सौ. प्रतिभा पाटील यांच्या हस्ते पद्मश्री स्वीकारताना श्री. भवरलाल जैन

श्री हिरालाल आणि श्रीमती गौरी जैन यांच्या घरी एक पुत्ररत्न जन्माला आले. नाव ठेवले भवरलाल. जणू काही हा बालक म्हणजे देवदूतच. गरीबांचा मसिहा. लाखांचा पोशिंदा.

सन १५ ऑगष्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. आझादी मिळाली. लाल किल्ल्यावर तिरंगा फडकला. जनता आनंदली. वाटले आता गरीबी जाईल. सुगीचे दिवस येतील. पण शेतकऱ्यांचे हाल काही संपत नव्हते. गरीबी काही केल्या पाठ सोडत नव्हती. कारण देश स्वतंत्र झाला तरी पारंपारिक शेती पध्दत बदलली नव्हती. भारत हा गरीब – मागासलेला देश म्हणुन ओळखला जात होता. असा तो काळ होता. सांगायचा मुद्दा हा की अशा काळात श्री भवरलाल जैन उर्फ मोठे भाऊंचा जन्म झाला. एका लहानशा वाकोड नावाच्या खेडयात जन्माला आलेले मोठे भाऊ. प्रातविधी उकिरडयावर तर रात्रीची झोप खळवाडीत. शाळा सुटली की चुलत्यांची भाजी भाकर घेऊन शेतावर जायचे आणि त्यांच्याच बरोबर कापूस किंवा कडबा यांनी भरलेल्या बैलगाडीवर झोपून परत घरी यायचे. त्यांनी कंदिलाच्या मंद मिणमिणत्या प्रकाशात अभ्यास करून वाणिज्य शाखेची पदवी बी.कॉम. मिळवली. आणि पुढे जाऊन कायद्याची पदवीही एल.एल.बी. मिळवली. सरकारी नोकरी मिळविण्यासाठी एम.पी.एस.सी.ची परीक्षाही दिली परंतु मनात चाकरमानी व्हायचे पटत नव्हते.

वयाच्या २६व्या वर्षी म्हणजे सन १९६- ६३ साली चक्क हातगाडी वरून केरोसिन विकायचा धंदा सुरू केला. मेहनत करायची तयारी आणि निग्रह या दोन गोष्टी मोठयाभाऊंकडून शिकण्यासारख्या आहेत. जर मनाचा निर्धार असेल तर दुनिया काय म्हणेल लोक हासतील का? याचा विचार न करता स्वतःला पटणाऱ्या धेय्यासाठी स्वतःला झोकून द्यायचे आणि ते यशस्वी करून दाखवायचे हे मोठया भाऊंकडून शिकण्यासारखे आहे.



श्री. भवरलाल जैन बैलगाडीतून फिरताना

त्याकाळी फक्त सात हजार रूपयांचे भांडवल उभे करून त्यांनी कुटुंबाची भागिदारी कंपनी चालू केली. पुढे व्यापारातील एकएक क्षेत्रात सफलता प्राप्त करत करत सन १९७८ मध्ये पपई पासुन बनणारे "पपेन"चे उत्पादन सुरू केले.

एका व्यवसायातच न रहाता त्यांनी स्कुटर, मोटर सायकल, कार गाडीचे पार्टस इत्यादी व्यवसायात देखील आपले पाय रोवले.

इथेच न थांबता पुढे सन १९८० साली पीव्हीसी पाइपांचे उत्पादन सुरू केले. त्या जमान्यात सिमेंटचे पाइप वापरले जायचे. मोठया भाऊंनी पीव्हीसी पाइप बनवून भारतात क्रांती केली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. काहीतरी नविन करायचे. जे कोणी करू शकणार नाही असे करून दाखवायचे अशी मानसिकता आणि जिद्द असलेल्या मोठयाभाऊंनी सन १९८७ साली ठिबक सिंचन पध्दती भारतात आणली. शेतकरी पारंपारिक पध्दतीने शेती करत होता. अजुनही करतो आहे. पण मोठयाभाऊंनी शेतकर्‍याला एक दिशा नक्कीच दाखवली आहे. जैन ठिबक सिंचनाचे वैशिष्ठ असे की आता

शेतकऱ्याला पुर्ण शेतात पाणी घालायला फिरावे लागत नाही. एका जागी उभे राहून एक नळ चालू केला की कितीही मोठया शेताला पाणी मिळू शकते. रोपाला पाहिजे तेवढेच पाणी देऊन पाण्याचीही बचत होते आणि मेहनतही वाचते.

ठिबक सिंचनाव्यतिरिक्त आज जैन उद्योग अनेक व्यवसायात आहे. सोलार, प्लास्टीक शिटस्, टिशू, कल्चरल फूड प्रोसेसिंग असे अनेक विभाग या उदयोगाने सुरू केले आणि यशस्वीपणे राबवले आहेत. यात मोठयाभाऊंचे संघटन कौशल्यही दिसून येते. त्यांचे चारही सुपुत्र अशोक, अनिल, अजित, अतुल आज त्यांच्याबरोबर उद्योग सांभाळत आहेत.

श्री. भवरलाल जैन उर्फ मोठेभाऊयांनी "शेती हाच भविष्यातील व्यवसाय" हे जाणले. आज जळगाव सारख्या जिल्हयाच्या ठिकाणी कित्येक हजार एकरावर उभी राहिलेली 'जैन इरिगेशन सिस्टीमस्लिमिटेड' ही कंपनी याची साक्ष देते. आज 'जळगाव म्हणजे जैन इरिगेशन' अशी व्याख्याच बनली आहे. या कंपनीने देशातच नाही तर परदेशही पादाक्रांत केले आहेत. अमेरिका, इंग्लंड, इस्रायल सारख्या देशातही या कंपनीची कार्यालये आणि कारखाने आहेत.

नुकताच जैन इरिगेशनने मुंबई आणि महाराष्ट्रातील बाजारपेठेमध्ये "फार्मफ्रेश" या नावाने आंब्याचा रस आणला आहे. आता मुंबईकरांना हापुस आंब्याचा रस वर्षाच्या ३६५ दिवस मिळू शकेल अशी व्यवस्थाच या जैन कंपनीने केली आहे.

आज श्री. भवरलाल जैन मोठे झाले पण ते कधी समाज ऋण विसरले नाहीत. आजही त्याच्याकडे गेलेली व्यक्ती रिक्त हाताने परत येत नाही.

गांधी फाउंडेशन भवरलाल आणि कांताबेन चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थांव्दारे समाजपयोगी अनेक कार्य केली जातात. तसेच आज जळगावात त्यांनी 'अनुभूती' हायस्कूल ही शाळा सुरू केली आहे. या शाळेत आज मुले तिथेच रहातात. मोठेभाऊम्हणतात– " या शाळेत मुलांना आईचा प्रेमळ स्पर्श सोडून बाकी सर्व मिळते." आणि ते खरेही आहे. त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने श्री. भवरलाल जैन उर्फ मोठेभाऊंना सन २००८ साली राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते "पदमश्री" देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच त्यांना अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. आज वयाच्या पंच्चाहत्तरीत प्रवेश करणाऱ्या मोठयाभाऊंचा कामाचा उरक लहानांनाही लाजवणारा आहे. अशा आमच्या सगळयांच्या 'मोठया भाऊंना' अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अनेक शुभेच्छा.

- मधुकर राऊत दादर मुंबई